जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७७ दिनांक - १२/०९/२०२४**

सहकारनगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## मोका व खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्हयात १ वर्षा पासुन पाहिजे असलेला सराईत गुंड सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर यांचेकडुन जेरबंद

दि.१०/०९/२०२४ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे सहकारनगर पोलीस ठाणे येथे हजर असताना असताना **पोलीस अंमलदार अमोल पवार व महेश मंडलीक यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की मोका मध्ये पाहिजे असलेला आरोपी नामे राजकुमार परदेशी हा बालाजीनगर येथील रजनी कॉर्नर जवळील धनकवडे हॉस्पीटल येथे मित्राला भेटण्यासाठी थांबला आहे** अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी सहकारनगर पोलीस स्टेशन कडिल वरिष्ठ पालीस निरीक्षक छगन कापसे यांना कळविली असता त्यांनी लागलीच सहापोनिरी. सागर पाटील व अंमलदार यांची टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **राजकुमार शामलाल परदेशी वय २६ वर्षे रा.स.नं.२३/१० मोरे चाळ,धनकवडे हॉस्पीटल जवळ रजनी कॉर्नर बालाजीनगर धनकवडी पुणे सध्या रा.ग्राम रामपुर पोस्ट लालगंज जिल्हा प्रतापगड राज्य उत्तर प्रदेश** असे सांगितले सदर आरोपी हा **सहकारनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.७७/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३०७,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महापो कलम ३७(१)(३) सह १३५,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७,महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)** गुन्हयात पाहीजे आरोपी असल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपी याच्यावर खुनाचा प्रयत्न,गंभीर दुखापत,मारामारी असे एकुण ०४ गुन्हे दाखल आहेत.सदर गुन्हयाचा अधिक तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग नंदिनी वग्यानी करीत आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग नंदिनी वग्यानी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.छगन कापसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.उत्तम भजनावळे यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक सागर पाटील,सहा.पोउपनिरी बापु खुटवड,पोलीस अंमलदार अमोल पवार, महेश मंडलिक,किरण कांबळे,बजरंग पवार,चंद्रकांत जाधव, अमित पदमाळे ,सागर कुंभार,खंडु शिंदे,विशाल वाघ,सागर सुतकर,योगेश ढोले,महेश भगत यांनी केली आहे.


फोन : ०२०-२४२२८११३ / २४२२६६०४
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
सहकारनगर पोलिस ठाणे
पुणे शहर

